# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**आस्थापना विभाग**

**एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५**

**फोन नंबर ०७१३२-२२३१०४**


जावक क्रमांक : गों.वि./आस्था/७५९ /२०१६ — दिनांक :१०/०२/२०१६

## परिपत्रक

उपरोक्त परिपत्रकाद्धारे सादर करण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेच्या नियमीत सभेमध्ये बाब क्र. ९ नुसार दिलेल्या मान्यतेनुसार विद्यापीठातील वित्त व लेखा विभागाचे परिपत्रक क्र. जा.क्र.-गोंवि/विलेवि/६०२/२०१५, दिनांक १४/०५/२०१५ नुसार पेट्रोल वाहन व डिझेल वाहन यांचे दर ठरविण्यात आलेले आहे. तसेच सदर परिपत्रकामध्ये प्रवासभत्ता देयक सोबत गेट पास, आर. सी. बुक व टोल टॅक्स ची झेरॉक्स प्रत साक्षांकीत करुन संलग्नित करणे आवश्यक आहे, असे नमुद केलेले आहे.

विद्यापीठामध्ये विविध मिटींगकरीता चारचाकी वाहनाने येणाऱ्या मान्यवरांचे सदर परिपत्रकानुसार देयक शोधनाची कार्यवाही घेण्याकरीता आर. सी. बुकच्या साक्षांकीत प्रतची अंकेक्षण विभागामार्फत मागणी केली असता उदासिनता दिसुन येत असुन देयक तपासणी करताना अडचणी येत असल्याबाबत वित्त व लेखा विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

विद्यापीठात येणाऱ्या मान्यवरांना विनंती करण्यात येते की, आपण खाजगी पेट्रोल/डिझेल वाहनाने विद्यापीठात येताना प्रवासभत्ता देयकाकरीता गेट पास, आर. सी. बुक व टोल टॅक्स ची झेराक्स प्रत साक्षांकीत करून संलग्नित करणे आवश्यक आहे. त्यानुसार आपण संबधीत कागदपत्राची प्रत वित्त व लेखा विभागात सादर करावी जेणेकरून देयकाचे शोधन सुलभ होईल.

करीता माहितीस सादर.

(डॉ. विनायक इरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१) विद्यापीठ अधिष्ठाता/व्यवस्थापन परिषद सदस्य/
विषयनिहाय अध्यक्ष/परिक्षा मंडळ व इतर विशेष आमंत्रीत सदस्य.

२) सर्व विभागप्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(मोहन एस. रामटेके)
उपकुलसचिव(प्रशासन)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

F:\BBDD\LATTER\Circular/132